# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

CB/20/2026

# प्रेसनोट

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक २५/०३/२०२६**

**एच.डी.एफ.सी.बॅंकेतील सिक्युरिटी असिस्टन्ट मॅनेजर सह ऑनलाईन जुगार चालविणाऱ्या 02 आरोपींना नवी मुंबई सायबर पोलीस ठाणे कडुन अटक**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे व पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ यांनी जास्तीत जास्त सायबर गुन्हे उघड करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक 25/01/2023 ते दिनांक 10/02/2026 रोजीचे कालावधी मध्ये फिर्यादी यांना SAT Sports ही गेमिंग कंपनी लिस्टेड कंपनी असल्याचा समज झाल्याने त्यांनी सदर कंपनीच्या ऑनलाईन गेमिंग वेबसाईटवर रजिस्ट्रेशन केले होते. त्यांना तीन पत्ती, कसिनो व इतर असे ऑनलाईन गेमिंगमध्ये रक्कम गुंतवणुक करण्यास सांगुन गुंतवणुक केलेली रक्कम व त्यावर मिळालेला अभासी नफा गेमिंगच्या वेबपोर्टलवर दर्शवुन नमुद गेमिंग कंपनीने एकुण 65,16,500/- रूपयांची फसवणुक केली म्हणुन सायबर पोलीस ठाणे गु.र.नं.11/2026, बी. एन.एस.कलम 319(2), 318(4), 3(5) सह ऑनलाईन गेमिंग प्रचार आणि नियमन कायदा कलम 9(1), 9(2), 9(3) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम 66(डी) अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हा दाखल झाले नंतर तपास पथकाने गुन्हयात फसवणुकी करिता वापरलेले मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करून आरोपी निष्पन्न केला. आरोपीचे जोगेश्वरी, मुंबई येथील परिसरात वास्तव असल्याची माहिती प्राप्त झाले नंतर पोलीस पथकाने सदर ठिकाणी जावुन शोध घेतला असता आरोपी १) विशाल रामरतन जयस्वाल, वय 26 वर्षे, व्यवसाय- नोकरी (एच.डी.एफ.सी सिक्युरिटी असिस्टन्ट मॅनेजर), राह. रूम नंबर 05, राजु निवास, चाळ नंबर 03, स्काउट कॅम्प, आर.डी.एन.सी गणेश नगर, बेहराम बाग, जोगेश्वरी(प), मुंबई व 2) आवेश धर्मेंद्र वर्मन, वय 26 वर्षे, व्यवसाय-धोबी, राह. डी 18, ट्रान्सिस कॅम्प, जय अंबे चाळ, ओशिवरा(प), मुंबई हे मिळुन आले. आरोपींना दिनांक 24/03/2026 रोजी अटक करण्यात आली असुन त्यांचेकडुन 86 बॅक अकाउंट कीट, 64 ए.टी.एम.कार्ड, 15 सिमकार्ड, 03 पॅनकार्ड, 03 मोबाईल, 01 लॅपटॉप, 01 रबर स्टॅम्प व 01 POS Machine इत्यादी मुद्येमाल जप्त केलेला आहे. अटक आरोपींची दिनांक 25/03/2026 रोजी पर्यत पोलीस कस्टडी प्राप्त आहे.

आरोपींकडे केलेल्या प्राथमिक तपासात ते भारतामध्ये सिमकार्ड खरेदी व ॲक्टीव करून अन्य साथीदारांचे मार्फतीने भारताबाहेर दुबई देशात राहणाऱ्या साथीदारांना पाठवत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदर गुन्हयात इतर ही आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्या अनुषंगाने सायबर पोलीस ठाणे मार्फत तपास सुरू आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी सहायक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, श्री. धर्मपाल बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे व.पो.नि./विशाल पाटील, पो. उप–निरी./राहुल कोळी, पो.ह./संदेश गुजर, पो.ना./मंगेश गायकवाड, पो.शि./जयेश जमदाडे, पो. शि./एकनाथ बुरूंगळे व म.पो.शि./पुनम गडगे यांनी केली आहे.

--------------------00000-----------------